स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मराठवाड्यातील अनाथ आश्रमातील मुलींच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे समाजशास्त्रीय अध्ययन

मानवविज्ञान विद्याशाखेअंतर्गत समाजशास्त्र विषयातील पीएच.डी.(Ph.D.)
पदवी साठी सादर केलेला संशोधन आराखडा

संशोधक
हाळदे शारदा संभाजीराव

मार्गदर्शक
डॉ. राऊतखेडकर एम.एस.
सहाय्यक प्राध्यापक
समाजशास्त्र विभागप्रमुख
शरदचंद्र कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नायगाव (बा.),
ता.नायगाव (खै.) जि.नांदेड.

संशोधन केंद्र
सामाजिकशास्त्रे संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ ,नांदेड.

डिसेंबर २०२४

मराठवाड्यातील अनाथ आश्रमातील मुलींच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे समाजशास्त्रीय अध्ययन

प्रस्तावना :-

मानवी समाजात अगदी प्राचीन काळापासून सामाजिक समस्या वेगवेगळ्या स्वरूपात अस्तित्वात असलेल्या दिसतात. एकोणिसाव्या शतकात सतीप्रथा, केशवपन, विधवापुनर्विवाह, यासारख्या असंख्य समस्या अस्तित्वात होत्या एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात प्रामुख्याने महाराष्ट्रात प्रबोधनाच्या विविध चळवळी सुरू झाल्या. आरंभीच्या काळात धर्मागत वैगून्य दूर करणे व स्त्री केंद्री प्रश्नाची सोडवणूक करणे ही उद्दिष्टे या चळवळीच्या मुळाशी होती. सामाजिक चळवळीचे मुख्य उद्दिष्टे सामाजिक न्यायाची स्थापना करणे हे होते सामाजिक चळवळीद्वारे या समस्यांचे निराकरण ही झाले परंतु त्याचबरोबर नवीन सामाजिक समस्यांची निर्मितीही झाली. उदा. बेकारी, बाल गुन्हेगारी, घटस्फोट, अनाथ मुले इत्यादी.

मुलांचे भविष्य पूर्णपणे पालकांवर अवलंबून असते, त्यांची मानसिकता वर्तन संपत्ती इत्यादी चांगली अर्थव्यवस्था कुटुंब त्यांच्या मुलांना देऊ शकते जीवनाच्या सर्व टप्प्यावर मुलांना पालकांची आवश्यकता भासते. अनाथ आश्रमात वास्तव्यास असणाऱ्या मुलांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीमध्ये अनेक आव्हाने व समस्या निर्माण होतात. अनाथालयात दाखल मुलांची काळजी व पालनपोषण करण्याची जबाबदारी समाजातील स्वयंसेवी संस्था घेतात संस्था समाजाला उत्तरदायी असतात. आई-वडिलांचे छत्र हरवलेल्या मुलांना आधार देऊन त्यांचे पुनर्वसन करण्याची भूमिका बजावतात.

भारतीय राज्यघटनेद्वारे अनाथ व अनाथाश्रमांचे संरक्षण व काळजी करण्याची जबाबदारी सरकारची आहे. अनाथ असा अल्पवयीन आहे ज्याने त्याचे किंवा तिचे पालक दोघेही गमावले आहेत किंवा त्यांच्या पालकांनी त्याला सोडले किंवा हरवले आहे. आणि त्याला त्याचे किंवा तिचे पालक कोण आहेत. याची माहिती नाही अनाथ बालक (समाजीक सुरक्षेची तरतूद) विधेयक २०१६ नुसार मुलांचे वैशिष्ट्ये ' एक मूल' असे आहे जे निर्जन झाले आहे किंवा एक तर पालक गमावले आहे किंवा त्यांचे पालक पालन पोषण करण्यास सक्षम नाहीत आणि ज्या मुलांना कुटुंबाचा एक भाग म्हणून महत्त्वाचे मानले जाते ते आपुलकी आणि काळजीपासून वंचित आहेत. अनाथांचे तीन प्रमुख प्रकारामध्ये वर्गीकरण केले आहे जे खालील प्रमाणे सूचीबद्ध आहेत.

मातृ अनाथ: एक मुल ज्याची आई मरण पावली आहे.
पितृअनाथ:- एक मुल ज्याचे वडील मरण पावले आहेत.
दुहेरी अनाथ:- एक मूल ज्याचे दोन्ही पालक (आई आणि वडील) मरण पावले आहेत.

अशा अनाथ मुलांना अनाथाश्रम (अनाथ आश्रम) किंवा बाल संगोपन, शिशुगृह, बालगृह संस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जागेची आश्रयाची आवश्यकता असते. अशा मुलांना जगण्यासाठी तसेच पुरेशी काळजी असेपर्यंत पालन पोषण करेल कुटुंब नसलेली मुले सर्वात जास्त

असुरक्षित असतात. १९६० च्या अनाथ आश्रम आणि धर्मादाय गृहे (पर्यवेक्षण आणि नियंत्रण) कायद्यानुसार घर म्हणजे संस्था ज्याला आश्रम म्हटले जाते. दुर्लक्षित महिला किंवा मुलांसाठी घर, विधवा घर किंवा इतर कोणत्याही नावाने देखभाल हेतूने ठेवले जाते.

भारतातील अनाथ आश्रम कायदे: अनाथ मुलांचे संरक्षण:-

भारत हा जगातील पहिल्या क्रमांकाचा सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश असून, मोठ्या संख्येने अनाथ मुलांचे भारत एक घर आहे. भारत देश गरिबी भूक आणि इतर सामाजिक समस्येने संघर्ष करत असताना, अनेक मुले एक तर त्यांचे पालक गमावतात किंवा मुलांना पालकांनी काही कारणास्तव सोडलेले असते. युनिसेफच्या म्हणण्यानुसार २००७ मध्ये भारतात सुमारे २५ दशलक्ष अनाथ मुले होती. २०२० मध्ये कोविड-१९ च्या साथीच्या आजाराची सुरुवात झाल्यानंतर अनाथांची संख्या झपाट्याने वाढली आहे. म्हणूनच अनाथांचे संरक्षण करण्यासाठी भारतातील विद्यमान स्थिती बदलणे आवश्यक आहे.

भारतीय राज्यघटनेच्या कलम ३९(एफ) नुसार मुलांना त्यांच्या वाढीनुसार आवश्यक असलेल्या पुरेशा संधी आणि संसाधने प्रदान केली जावीत. आणि त्यांचे शोषण आणि त्याग करण्यापासून संरक्षण करण्यासाठी राज्य धोरणे बनवून त्याची अंमलबजावणी करणे अभिप्रेत आहे. बहुतांश परिस्थितीमध्ये केवळ अनाथाश्रमातच अनाथ मुलांना १४ वर्षापर्यंत अन्न, वस्त्र, आरोग्य, निवारा आणि शिक्षण या मूलभूत गरजा पुरवल्या जातात. देशातील अनाथ आश्रम सुस्थितीत राहावेत यासाठी कायदे करण्याचा अधिकार राज्याला देण्यात आला आहे. पुरेसा निधी शासन उपलब्ध करून देत आहे. परंतु तो सध्य परिस्थितीत पुरेशा नाही.

अनाथ आणि अनाथाश्रम अर्थ व स्पष्टीकरण :-

ज्या बालकांना आई-वडील नसतात किंवा ज्या बालकांच्या संभाळ आई-वडील करू शकत नाहीत किंवा जन्मतः ज्या बालकांना टाकून दिले जाते त्यागले जाते अशा सर्व बालकांना अनाथ बालके म्हणतात. अशी बालके आभावग्रस्त असतात कारण त्यांना मातापित्यांचे भावंडांचे प्रेम लाभत नाही, ज्यांच्या गरजा प्रामुख्याने समतोलाने भागविला जात नाहीत, अनाथ बालकांच्या सर्वांगीण विकास होण्यावर मर्यादा पडतात म्हणून असे म्हणता येईल की, जी मुले समाजाकडून सामान्य मुलांना मिळणाऱ्या सेवा सुविधा व सवलतीपासून वंचित राहतात त्यांना अनाथ म्हंटले जाते. अनाथ मुलांना समाजाकडून सामान्य मुलांना मिळणाऱ्या सेवा सुविधा, काळजी संरक्षणाची गरज असते. अशी गरज असणारी मुले म्हणजे अनाथ मुले होत. अशी मुले मूलभूत गरजा, शिक्षण, व्यवसाय इत्यादी पासून वंचित उपेक्षित असतात. वास्तविक पाहता शरीराने व मनाने सामान्य मुलांप्रमाणे असणारी मुले सामान्य जीवन मात्र जगू शकत नाहीत त्यांच्या वाट्याला आलेले हे सामाजिक अपंगत्व त्यांच्यावर समतोलाच्या परिस्थितीने लादलेले असते असे म्हणावयास हरकत नाही अशा अनाथ मुलांना राहण्यासाठी असलेली संस्था म्हणजे 'अनाथाश्रम' किंवा 'बालकाश्रम' होय.

अनाथ मुलांची शासनाकडून देखभाल व राहण्याची व्यवस्था केली जाते तर काही खाजगी संस्थामार्फतही अशा मुलांची काळजी घेतली जाते अशा मुलांना अनाथाश्रमाच्या शाळातून

किंवा इतर खाजगी सरकारी शाळेतून शिकण्याची सोय उपलब्ध करून दिली जाते. जगातील पहिले अनाथाश्रम न्यूयॉर्क मध्ये इ.स. १८०६ मध्ये 'एलिझाबेथ हॅमिल्टन' यांनी सुरू केले. एलिझाबेथ हॅमिल्टन स्वतः विधवा होत्या म्हणून त्यांना समाजातील समस्येबद्दल तळमळ होती. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी पुढाकार घेऊन वृद्धाश्रम, बालकाश्रम, अनाथाश्रम यांची स्थापना केली. रामकृष्ण मिशन मुक्तीफौज यांनीही असे अनेक आश्रम काढले. महाराष्ट्र, मद्रास, बंगाल, उत्तर प्रदेश इत्यादी राज्यात अनेक अनाथ, बालकाश्रम सुरू करण्यात आले. याच सुमारास मुलांच्या प्रश्नाबरोबर कुमारी माता विधवा व परितक्त्या महिलांचा प्रश्न भारतीय समाजापुढे निर्माण झाला. भारतात विशेषतः विधवा व कुमारी माता यांना आत्महत्येपासून परावृत्त करून सामाजिक छळाविरुद्ध संरक्षण देण्याची गरज निर्माण झाली. १८८९ मध्ये पंडिता रमाबाई यांनी "रमाबाई असोसिएशन" तर्फे मुंबई व पुणे येथे केवळ विधवांसाठी "शारदासदन" नावाची संस्था सुरू केली. परंतु ती संस्था अल्पकालीन ठरली पुढे १८९६ साली महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी पुण्यात अनाथ मुलींसाठी "बालिकाश्रम" सुरू केले. हळूहळू बहुतेक राज्यात मुलींसाठी अनाथश्रम काढण्यात आले.

महाराष्ट्रात 'महाराष्ट्र स्टेट विमेन रेस्क्यू होम', 'बॉम्बे व्हिजिलन्स असोसिएशन शेल्टर', 'लीग ऑफ मर्सी सेंटर', 'हिंदूसभा, सॉल्व्हेशन आर्मी', 'इंडस्ट्रियल इन्स्टिट्यूट ऑफ वुमन्स', 'सेंड कॅमिरन्स होम', 'असोसिएशन ऑफ मॉरल सोशल हायजिन' संस्था स्त्रियांना संरक्षण देण्याचे कार्य करीत आहेत.

महाराष्ट्र राज्यातील अनाथ आश्रमातील मुलांना किंवा मुलींना अठरा वर्षाच्या ऐवजी २३ वर्षापर्यंत अनाथश्रमात राहता येणार आहे असा निर्णय महिला व बालकल्याण मंत्री यशोमती ठाकूर यांनी घेतला. त्यानुसार आता अनाथाश्रमातील मुनांना ० ते २३ वर्षापर्यंत अनाथाश्रमात राहता येणार आहे असा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. अनुरक्षण गृहातील अनुरक्षण सेवा देण्यासाठीची वयाची अट दोन वर्षांनी शिथिल करून अशा मुलांना वयाच्या २३ व्या वर्षापर्यंत अनुरक्षण सेवेचा लाभ उपलब्ध करण्यास मान्यता देण्याचा निर्णय महिला व बालविकास विभागाने घेतला आहे. भारतीय समाजात अनाथ मुलांचा प्रश्न गंभीर रूप धारण करताना दिसत आहे. आज भारतात १०९२ अनाथाश्रमे आहेत. या अनाथाश्रमात सरासरी अंदाजे ८ हजार एवढी मुले आहेत. महाराष्ट्रात मुलांची १०० ते १२० एवढी अनाथ आश्रम आहेत. मराठवाड्याचा विचार करता १९ मुलींची अनाथ आश्रम आहेत. त्यामध्ये सरासरी अंदाजे ६०० मुली आहेत. मराठवाडा महाराष्ट्रातील मुंबई भागात दिवसे दिवस अनाथ आश्रमांची संख्या वाढत आहे. एकूण अनाथ आश्रमांच्या तुलनेत मुलींची संख्या जास्त आहे. तसेच अनाथ आश्रमाला मिळणारे अनुदान पुरेसे नाही. ही समस्या अनाथालयाची आहे यावर शासनाने वेळीच लक्ष देण्याची गरज असल्याचे मत तज्ञानी व्यक्त केले आहे.

अनाथ आश्रमाची ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

जागतीक पातळीवर सर्वप्रथम स्थापन झालेल्या अनाथ आश्रमाचे नाव Ophanotrophia असे आहे. हे अनाथ आश्रम इ.स. पहिला शतकात स्थापन करण्यात आले आहे. ज्यू (यहूदी) नियमानुसार विधवा यांनी अनाथ तसेच Antherian law नुसार सैन्यातील शहिदांची १८

वर्षाखालील आपत्य यांना कायद्याने संपूर्णपणे संरक्षण दिले जात होते. पूर्वीच्या काळी अनाथ मुलांची देखभाल करण्याची जबाबदारी फादर कडे दिलेली असत एका विशिष्ट वयापर्यंत या मुलांची सर्व देखभाल केली जात असे.

ब्रिटिश काळामध्ये भारतात अनेक चांगले व समाज उपयोगी कायदे व त्यांची अंमलबजावणी करणारी संस्थात्मक यंत्रणा सक्रिय होती. भारतात बालकल्याणाचा पाया ब्रिटिशांनी घातला. उन्मार्गी मुलांना चांगले दर्जेदार व गुणात्मक शिक्षण व संस्कार देणारे वातावरण निर्माण करून मुलांना स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने इ.स.१८४३ साली डेव्हिड ससुन इंडस्ट्रियल स्कूल या संस्थेची स्थापना करण्यात आली. महात्मा ज्योतिबा फुले, पंडिता रमाबाई, महर्षी धोंडो केशव कर्वे या समाजसुधारकांनी ब्रिटिशांच्या कार्याची प्रेरणा घेऊन मुलांसाठी अनेक संस्था स्थापन केल्या.

इ.स. १९०९ साली 'सेवासदन' नावाची संस्था रमाबाई रानडे यांनी पुणे येथे स्थापन केली. "मना चंदनाचे परीत्वां झिजावे" हे संस्थेचे ब्रीद सार्थक करीत आणि स्त्रियांना आत्मनिर्भर करण्यासाठी त्यांना सर्व सर्वार्थाने सर्वांगीण शिक्षण देणे हे उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून संस्थेची शतकोत्तर रोप्य महोत्सवाच्या दिशेने यशस्वी वाटचाल सुरू आहे.

युनायटेड नेशन्सने घोषित केलेला आंतरराष्ट्रीय बाल दिन ११ ऑक्टोबरला जगभरात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. जगभरातील मुलींना भेडसावणाऱ्या लैंगिक असमानतेबद्दल शिक्षण, पोषण, कायदेशीर हक्क, वैद्यकीय सेवा आणि भेदभावापासून संरक्षण व महिला वरील हिंसाचार आणि बालविवाह यासारख्या क्षेत्राचा समावेश होतो. भारतात दरवर्षी २४ जानेवारी राष्ट्रीय बालिका दिन म्हणून साजरा केला जातो. राष्ट्रीय बालिका दिन साजरा करण्यामागचा उद्देश भारतातील मुलींना आधार आणि संधी प्रदान करणे हा आहे. भारतात ११ डिसेंबर २००७ मध्ये युनिसेफ इंडियाने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार ० ते १७ वयोगटातील २५,७००,००० एवढी अनाथ मुले आहेत.

भारतातील अनाथ मुलांच्या संकटावर आधारित नियतकालिकातील लेखामध्ये भारतातील अनाथ मुलांचे वास्तव मांडण्यात आले आहे. भारतात २०२० कोविड नंतर अनाथ मुलांची संख्या तीस लाखाहून अधिक असल्याचे सर्वेक्षणाअंती मांडण्यात आले आहे. बहुदा ज्याचा कोणी पालक नाही अशा व्यक्तींना विशेषतः मुला मुलींना अनाथ संबोधले जाते. लहान अनाथ मुले धनार्जन करून स्वतःचे पालन पोषण करू शकत नाही त्यांना पालनपोषणासाठी दुसऱ्यावर किंवा समाजावर अवलंबून राहावे लागते म्हणून महाराष्ट्र शासनाने अनाथ मुलांना महाराष्ट्रात खुल्या (ओपन) प्रवर्गातील जागेत १%(एक) टक्के आरक्षण मंजूर केले आहे.(अनाथ आरक्षणाबाबत शासन निर्णय दि. ६ एप्रिल २०२३) १८ वर्षाखालील मुलांना ओळख मिळावी त्यांना शिक्षण घेताना सवलत मिळावी किंवा कुठेही समाजात स्थिरावताना सहानुभूतीने का होईना पण त्यांना मदत मिळावी या हेतूने महिला बालकल्याण विभागाकडून २०१२ पासून आनाथ मुलांना ओळखपत्र वितरित करण्यात येत होते. महाराष्ट्रात अनाथ मुलांना ओळखपत्र देण्यात येत होते. याबाबत फारशी कुणाला माहिती नव्हती २०१८ पर्यंत महाराष्ट्रात फक्त एकाच मुलाला हे ओळखपत्र मिळाले होते. तेही त्या सजग मुलाने विभागाच्या गेटवर आंदोलन करून मिळवले होते. अनाथ ओळखपत्र अनाथ आरक्षणासाठी महत्त्वपूर्ण ठरत आहे.

अनाथ मुलींची व अनाथ आश्रमांची व्याख्या व अर्थ:-

खालील मुद्यांच्या आधारे अनाथ मुलींची व्याख्या व अर्थ स्पष्ट होतो.

1. *अनाथ एक किंवा सहसा दोन्ही पालकांच्या मृत्यूमुळे वंचित असलेले मूल*
2. *संरक्षण किंवा कायद्यापासून वंचित मुलं*
3. *ज्या मुलींची वयाची १८ वर्ष पूर्ण होण्यापूर्वी आई-वडिलांचे निधन झाले आहे किंवा ज्यांचे शासन मान्यताप्राप्त संस्थेमध्ये पालनपोषण झाले आहे अशा मुली.*

अनाथश्रम :-

"आश्रम म्हणजे मुलांचे स्वागत काळजी संरक्षण आणि कल्याणासाठी स्थापन केलेली संस्था"

ऐतिहासिक मराठवाडा :-

ऐतिहासिक मतानुसार मराठवाड्यात मानवाची वस्ती ७०००० वर्षापासून असून १८६५ मध्ये वायने या भूगर्भशास्त्रज्ञाने पराश्म युगीन हत्यारांचा संदर्भ दिला आहे. मानवाच्या स्थिर जीवनाला प्रारंभ झाला तेव्हापासून मराठवाड्याचे अस्तित्व आढळते. महाराष्ट्र राज्यांमधील मराठवाडा हा प्रादेशिक विभाग असून राज्यातील महसूल विभागापैकी सर्वात मोठा विभाग आहे. या विभागाचे भौगोलिक क्षेत्र ६४२८६ चौ.मि कि. असून उत्तरेस महाराष्ट्र राज्याचे जळगाव, बुलढाणा हे दोन जिल्हे येतात तर पश्चिमेला नाशिक, अहमदनगरच्या सीमा येतात आणि दक्षिणेला सोलापूर कर्नाटकातील गुलबर्गा व बिदर जिल्हे येतात तर पूर्वेला आंध्र प्रदेश, तेलंगणा राज्याचे निजामाबाद,कामारेड्डी, आदीलाबाद तसेच महाराष्ट्रातील अकोला, यवतमाळ जिल्ह्यांच्या सीमा येतात.

प्राकृतिक दृष्ट्या मराठवाड्याचे दोन भाग पडतात. पठाराचा प्रदेश व सखल प्रदेश बालाघाटच्या रांगा परभणी जिल्ह्या वरून जातात. पुढे उस्मानाबाद (धाराशिव) जिल्ह्यात शिरून त्यांचे दोन भाग पडतात १) ईशान्य आणि पूर्वेकडील पठार २) नैऋत्य व दक्षिण भारतातील सखोल प्रदेश पर्वतांची तिसरी रांग औरंगाबाद व बीड जिल्ह्याची विभागणी पठार व सखल प्रदेशामध्ये बालाघाट, जालना डोंगर आणि अजिंठा डोंगर या प्रदेशातील डोंगर होत.

निजामकालीन महाराष्ट्र :-

मराठवाड्यावर निजामशाहीने २५ वर्षे राज्य केले असल्यामुळे येथील धार्मिक सामाजिक परिस्थिती बिकट झाली होती. कारण या काळामध्ये हिंदू धर्मात विविध धर्म, पंथ, परंपरा प्रचलित होत्या. वेगवेगळ्या कर्मप्रथांची पाळेमुळे एकमेकात गुंतलेली आहेत. त्यांना एकमेकापासून दूर करता येत नव्हते म्हणून ही अनेक समस्या मराठवाड्यात अस्तित्वात होत्या.

मराठवाड्यातील अनाथ मुली व अनाथाश्रम :-

भारतीय समाजात अनाथ मुलांचा प्रश्न गंभीर रूप धारण करताना दिसत आहे. आज भारतात १९९२ अनाथश्रमे आहेत. एकट्या महाराष्ट्रात १७७ अनाथ आश्रम आहेत. या अनाथाश्रमात सरासरी अंदाजे ३ हजार एवढी मुले आहेत. मुलींसाठी कार्य करणारे अनाथाश्रम १२० असून मराठवाड्याचा विचार करता मुलींची एकूण ११ अनाथाश्रम आहेत, त्यामध्ये सरासरी अंदाजे ६०० मुली आहेत. मराठवाडा मुंबई भागात दिवसेंदिवस अनाथ आश्रमाची संख्या वाढत आहे. एकूण अनाथ आश्रमाच्या तुलनेत मुलींची संख्या जास्त व अनाथाश्रमांची संख्या कमी आहे असे निदर्शणास येते.

संदर्भ साहित्याचा आढावा :-

अनाथ आश्रम आणि अनाथ मुली यांच्या विषयी आजपर्यंत समाजशास्त्रीय अध्ययन फार कमी झालेले आहेत . प्रस्तुत संशोधनासाठी ललित लेखनाच्या स्वरूपात झालेले काही लेखन व अनाथ आश्रमातील मुलाविषयी झालेल्या संशोधन प्रबंधांची मदत घेण्याचे संशोधन करताना प्रस्तावित केले आहे. आश्रम व्यवस्थापनाशी संबंधित असणाऱ्या व्यक्तींना आलेले अनुभव, पुस्तक रूपाने प्रसिद्ध केले आहेत, तर काही लेखन निरीक्षणावर आधारित आहे. या लेखनापैकी काही निवडक अशा संदर्भ साहित्याचा व शोध प्रबंधाचा अंतर्भाव संशोधन कार्यात करण्यात येणार आहे.

सामंत वंदना जनार्दन *(२०१२):- यांनी मुंबईतील अनाथ आश्रम आणि अनाथ मुले यांचा समाज शास्त्रीय अभ्यास या विषयावर २०१२ मध्ये पीएच.डी. पदवीसाठी एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठात प्रबंध सादर केला आहे. यामध्ये त्यांनी मुंबई येथील ४७ अनाथ आश्रमातील मुलांचे अध्ययन केले. त्यातील मूलतः ३०% नमुना निवड करून मुलांच्या अनाथ आश्रमातील परिस्थितीचे विश्लेषण केले आहे. संशोधन कार्यादरम्यान केलेल्या निरीक्षण व निष्कर्षावरून अनाथ मुलांसाठी शासनाची उदासीन भूमिका व अनाथ मुलांची समस्या गंभीर होत असल्याचे निष्कर्ष मांडले आहेत.*

घाडगे अशोक परशुराम *(२०२०):- यांनी महाराष्ट्र राज्यातील अनाथ मुलांच्या सामाजीकीकरणात आणि पुनर्वसनात बालगृहाचे योगदान, या विषयावर २०२० मध्ये पीएच.डी. पदवीसाठी भारती विद्यापीठ पुणे, विद्यापीठातून प्रबंध सादर केला. महाराष्ट्रातील एकूण मुलांच्या अनाथ आश्रमातील निवडक अनाथ आश्रमांची निवड करून प्रत्येक आश्रमातील २०% अनाथ मुलांची नमुना निवड करून आपल्या शोध प्रबंधात मुलांच्या पुनर्वसनाच्या बाबतीत समाधानकारक साधने उपलब्ध निर्माण करून दिली गेली नाहीत असा निष्कर्ष काढला.*

मिर जावेद अहमद *(२०२१):- यांनी अनाथांच्या समाजातील शैक्षणिक स्थितीचा अभ्यास या विषयावर २०२१ मध्ये पीएचडी पदवीसाठी केंद्रीय विद्यापीठ कश्मीर या विद्यापीठातून प्रबंध सादर केला. त्यामध्ये त्यांनी श्रीनगर जिल्ह्यातील अनाथ मुलांच्या आश्रमांचा अंतर्भाव करून काही*

निवडक मुलांची नमुना निवड करून शोध प्रबंधात अनाथ आश्रमातील मुलांच्या शैक्षणिक व सामाजिक स्थिती मधील प्रगती समाधानकारक नसल्याने अशा मुलांना शैक्षणिक व सामाजिक समस्या निर्माण झाल्या आहेत व व्यवसायिक समस्या आहेत असा निष्कर्ष काढला आहे.

***शुक्ला रेणू** (२००६):- यांनी अनाथ महिलांचे व्यक्तिमत्व या विषयावर २००६ मध्ये लखनौ विद्यापीठातून प्रबंध सादर केला. त्यामध्ये त्यांनी लखनौ शहरातील निवडक अनाथ महिलांच्या व्यक्तिमत्त्वाच्या समस्यांचे मानसशास्त्रीय अध्ययन करून त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील समस्या व उपाय यामध्ये सूचना केल्या आहेत. व्यक्तिमत्व शिक्षणाच्या अभावामुळे त्यांना समस्या निर्माण झाल्याचा निष्कर्ष काढला आहे.*

***श्री ओक प्रभाकर गंगाधर** (२००५):- यांनी कथा अनाथाश्रमांच्या हे श्री ओक प्रभाकर गंगाधर यांचे पुस्तक उमा प्रकाशन पुणे यांनी ऑगस्ट २००५ मध्ये प्रकाशित केले आहे. श्री ओक प्रभाकर गंगाधर सेवानिवृत्तीनंतर काही वर्ष पूर्ण वेळ श्रद्धानंद महिला आश्रमामध्ये कार्यरत होते. यानिमित्ताने आश्रमास जवळून पाहण्याची अनुभवण्याची संधी त्यांना प्राप्त झाली. प्रस्तुत पुस्तकात ते श्रद्धानंद महिला आश्रमाबद्दल आश्रमाच्या कार्याबद्दल माहिती देता-देता एकूण भारतीय परंपरेतील आश्रम संस्थेचा आढावा घेतात. आणि आश्रम संस्थेचे कालातीत असणारे महत्त्व स्पष्ट करतात.*

***गोखले शरदचंद्र दामोदर** (१९५४):- यांनी नावडती मुले हे पुस्तक नीलकंठ प्रकाशन पुणे यांनी इ.स.१९५४ (प्रथम आवर्ती) साली प्रकाशित केले आहे. प्रस्तुत पुस्तकात गोखले यांनी समाजात नावडत्या ठरणाऱ्या मुलांचे चित्रण केले आहे. त्याचबरोबर अशी मुले नावडती ठरण्यामागील कारणांचा शोध घेतला आहे. हा शोध घेताना "नावडत्या मुलांना " पाहण्याचा सामाजिक दृष्टिकोन काल व आज मुलांच्या हक्काची सनद,काही नावडत्या मुलांची जीवनचित्रे या मुलांच्या वर्तन धर्माला अनुवंशिकता व परिस्थिती कारणीभूत आहे का? अपंग मुले, मनोव्यथित मुले सामाजिक दृष्ट्या अपंग मूले अंध, मुकी, बहिरे मुले इत्यादी संदर्भात विश्लेषण व ऊहापोह करीत सामाजिक समस्येवर काही उपाययोजनाही सुचविण्याचा प्रयत्न केला.*

संशोधनाचे महत्त्व :-

भारतात अगदी प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत अनाथ उपेक्षित मुलींचे अनेक प्रश्न अस्तित्वात असलेले दिसतात . समाजसुधारक, समाजसेवक, स्वयंसेवी सामाजिक संस्था, सरकारी कायदे इत्यादीमुळे . अनाथ मुलींची समस्या नष्ट झालेली नाही किंवा काही प्रमाणात कमीही करता आली नाही. याचे कारण हा प्रश्न निव्वळ कायद्याच्या चौकटीत बसणारा नाही. समाजाच्या सामाजिक नैतिक, सांस्कृतिक, मूल्यामधून निर्माण झालेला आहे. हा प्रश्न जसा मानवनिर्मित आहे तसाच तो नैसर्गिक आपत्तीमुळे ही निर्माण होणारा आहे. उदा. १९९३ साली महाराष्ट्रातील लातूर धाराशिव (उस्मानाबाद) जिल्ह्यात झालेला भूकंप या भूकंपात अनेक मुले अनाथ झाली. या मुलांचे पुनर्वसनाचे काम शासकीय यंत्रणेबरोबरच स्वयंसेवी संस्थांनी केले.

अलीकडील कोविड-१९ मुळे उद्भवलेल्या परिस्थितीत अनेक मुलांचे आई वडिलांचे छत्र हरवले आहे. हजारो मुले अनाथ झाली आहेत. अशा मुलांच्या पुनर्वसनासाठी शासनस्तरावर पुनर्वसन काम मोठ्या प्रमाणात चालू आहे. आधुनिक समाजात अनाथ आश्रमाचे सामाजिक व आर्थिक स्थान, दर्जा व त्याची असणारी गरज समजून घेण्याचा प्रयत्न या अध्ययनातून करण्यात येणार आहे. अनाथ मुलांची संचालकाशी, अनाथ आश्रमातील अधिकाऱ्यांशी आणि इतर कर्मचाऱ्यांशी असणारे आंतरक्रियात्मक नातेसंबंध समजून घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधनात केला जाणार आहे. अनाथ आश्रम व अनाथ मुली यांच्या जीवनातील सर्व पैलूंची माहिती उपलब्ध करून घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधनात केला जाणार आहे.

मराठवाड्यातील अनाथ मुलींचे प्रश्न व अनाथ आश्रमाचे स्वरूप कसे आहे अनाथ आश्रमांची आवश्यकता किती प्रमाणात असणार आहे याचा शोध घेण्यासाठी तसेच अनाथ मुलींच्या सामाजिक आर्थिक स्थितीचा आढावा घेण्यासाठी अनाथ मुलींच्या सर्वांगीण अभ्यास करण्यासाठी मराठवाड्यातील अनाथ आश्रमातील मुलींच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे समाजशास्त्रीय अध्ययन हा विषय संशोधनासाठी निवडला आहे. प्रस्तुत संशोधनाच्या समस्येच्या वेगवेगळ्या पैलू वर लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे अनाथ आश्रमात राहणाऱ्या मुली संस्थेत काम करणारा कर्मचारी वर्ग यांना आश्रमांकडून परविले जाणाऱ्या सोयी सुविधा आश्रमाची कार्यवाही पद्धती मुलींची सामाजिक व आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी केला जाणारे प्रयत्न इत्यादी संदर्भातील माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

संशोधन विषय :-

प्रस्तुत संशोधनाचा विषय मराठवाड्यातील अनाथ आश्रमातील मुलींच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे समाजशास्त्रीय अध्ययन हा आहे.

संशोधनाची उद्दिष्टे/ उद्देश :-

१) अनाथ मुलींच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे अध्ययन करणे.
२) अनाथ मुलींच्या अनाथाश्रमाबद्दल आणि एकूण समाजाबद्दल मते आणि अभिवृत्तीचे स्वरूप अभ्यासणे.
३) अनाथ मुलींचे प्रश्न आणि समस्यांचे अध्ययन करणे.
४) मराठवाड्यातील अनाथाश्रमात दाखल होणाऱ्या मुलींची अनाथ आश्रमात येण्याची कारणे समजून घेणे.
५) अनाथ मुलींचे पुनर्वसन व पुनर्वसन स्थिती अभ्यासणे.
६) अनाथ आश्रम स्थापनेमुळे समाजात झालेल्या बदलाचे अध्ययन करणे.

संशोधनाची गृहितके :-

१) अनाथाश्रमातील मुलींची सामाजिक व आर्थिक स्थिती असामन्य असते.
२) अनाथ आश्रमातील मुलींच्या मनात समाजाविषयी व समाजाची मुलींविषयीची भावना उदासीन असते.
३) अनाथ आश्रमातील मुलींचे अनेक प्रश्न व समस्या असतात.
४) अनाथ आश्रमात दाखल होणाऱ्या मुलींची अनाथ आश्रमात येण्याची करणे दुःखद व क्लेषदायक असतात.
५) अनाथ आश्रमातील मुलींच्या पुनर्वसनाची सद्यस्थिती असमाधानकारक आहे.
६) अनाथ आश्रमातील मुलींना आई वडिलांनी किंवा पालकांनी त्यागले आहे.

संशोधन पद्धती :-

शास्त्रीय संशोधनाचा मूळ गाभा हा संशोधन पद्धतीशास्त्रामध्ये असतो. संशोधनकार्य यशस्वी होण्यासाठी,उद्देश प्राप्त होण्यासाठी संशोधन पद्धतीचा खूप मोठा वाटा असतो. म्हणून संशोधनकार्यासाठी कोणत्या संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार? संशोधनाचा अर्थ व स्वरूप कसे असणार आहे? तसेच संशोधन पद्धतीचे महत्व व पद्धत अधोरेखीत करत असताना कोणकोणत्या तंत्राचा वापर करण्यात येणार आहे. तसेच प्रस्तुत संशोधनाचे कार्य कशाप्रकारे करण्यात येणार आहे? या सर्व प्रश्नांची उकल येथे करण्यात येणार आहे.

मराठवाड्यातील अनाथ आश्रमातील मुलींच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे समाजशास्त्रीय अध्ययन या विषयाच्या अध्ययनामध्ये अनाथ मुलींचे जीवनमान त्यांचे सामाजिक आर्थिक स्वरूप,अनाथ आश्रमामुळे त्यांच्या जीवनावर झालेल्या बदलाचे परिवर्तनाचे समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन करण्यात येणार आहे. तसेच आदी बाबीवर योग्य ठरणाऱ्या संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. सामाजिक संस्थात्मक व गुणात्मक संशोधनाची मिश्र पद्धत वापरण्यात येणार आहे.

अनाथ मुलींशी संबंधित असलेल्या मराठवाडा विभागातील अनाथ आश्रम व अनाथ आश्रमातील मुलींची माहिती घेण्यासाठी अनाथ मुलींवर आधारित पीएच. डी. शोधप्रबंध , अनाथ मुली वरील संशोधन पुस्तके, शासकीय कार्यपुस्तिका अहवाल लेखन, मुलासंबंधीतील कायदे, धोरणे, वर्तमानपत्र लेख, आणि आदी स्वरूपाच्या आकडेवारीचा अभ्यास करण्यात येणार आहे. आराखड्यात एकूण पाच प्रकरणे निश्चित करण्यात येणार आहेत. थोडक्यात एकूण संशोधनाकरिता पूर्ण प्रकरणाची रूपरेषा निश्चित करण्यात आली आहे.

संशोधनाच्या व्याख्या :-

१) ***जे डब्ल्यू वेस्ट यांच्या मते :-***

"संशोधन म्हणजे वैज्ञानिक पद्धती प्रत्यक्ष कार्यान्वित करण्याची सूव्यवस्थित व नियमबद्ध अभ्यासण्याची प्रक्रिया होय."

२) ***सी ए. मोझर त्यांच्या मते:-***

"संशोधन म्हणजे सामाजिक घटना व सामाजिक समस्यांच्या बाबतीत नवीन ज्ञान प्राप्त करून घेण्याच्या उद्देशाने केलेले क्रमबद्ध प्रयत्न होय."

संशोधनाची व्याप्ती :-

महाराष्ट्र राज्यातील मराठवाडा एक प्रशासकीय विभाग असून संशोधनकर्तीने मराठवाडा विभागाची संशोधन क्षेत्र म्हणून निवड केलेली आहे. मराठवाड्यातील मुलींच्या आर्थिक व सामाजीक स्थितीवर समाजशास्त्रीय अध्ययन करण्यात येणार आहे.

नमुना निवड :-

संशोधनाची उद्दिष्टे तपासण्यासाठी नमुना म्हणून मराठवाड्यातील १९ मुलींच्या अनाथ आश्रमांची निवड करण्यात येणार आहे. नमुना म्हणून निवड करण्यात आलेल्या मुली विविध जाती, धर्माची, व वयोगटाची आहेत. अनाथ आश्रमात 0 ते २३ वयोगटाची मुली असतात. त्यातील 0 ते ६ वयोगटातील मुली एकदमच लहान असतात. ती प्रश्नावलीचे उत्तरे देऊ शकणार नाहीत. अनाथ आश्रमात दाखल मुलींचा विचार करता मराठवाड्यातील अनाथ आश्रमांची निवड करताना सांभाव्यता नमूना निवड प्रकारांतर्गत स्तरित याहच्छिक नमुना निवडीचा वापर करण्यात येणार आहे. या दृष्टीने एकूण अनाथ मुलींचे आश्रम आणि त्यापैकी अनुदानित व विनाअनुदानित आश्रम या गोष्टी विचारात घेऊन सर्व स्तरावरून प्रातिनिधिक नमुन्याची निवड करण्यात येणार आहे.

मराठवाड्यातील १९ मुलींच्या अनाथ आश्रमाची संख्या विचारात घेता सर्व मुलींच्या अनाथ आश्रमातून ४० मुलींचे किंवा प्रत्येक जिल्ह्यातील ४० मुलींचे मिळून प्रस्तुत शोध प्रबंधाकरिता एकूण ३२० अनाथ मुलींची नमुना निवड करून प्रत्यक्ष अनाथ आश्रमात जाऊन सर्वेक्षण मुलाखत, अनुसूची व निरीक्षणाद्वारे संशोधनाचे काम पूर्ण करावयाचे आहे.
(एकूण उत्तरदाते ८ X ४० = ३२० असे आहेत.)

तथ्य संकलन पद्धती :-

मराठवाड्यातील अनाथ आश्रमातील मुलींच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास करताना गुणवत्तेला अतिशय महत्त्व देण्यात येणार आहे. त्याचबरोबर संस्थात्मक माहितीचा आधार घेतला जाणार आहे. या संशोधन कार्यासाठी मुलाखत अनुसूची निरीक्षण प्रत्यक्ष मुलाखात ही पद्धत उपयोगात आणली जाणार आहे तसेच संशोधन पूर्ण करताना दुय्यम स्त्रोताचा वापर करण्यात येणार आहे.

प्राथमिक स्त्रोतामध्ये सर्व समावेशक पद्धत म्हणून मुलाखत पद्धत व निरीक्षण अनुसूची प्रमाण मानण्यात येईल तर दुय्यम स्त्रोतांमध्ये पुस्तके ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, पूर्व संशोधन साहित्य, शासकीय अहवाल, आयोगाचा अहवाल, मासिके, वर्तमानपत्रे, कायदे, इत्यादीचा वापर करण्यात येणार आहे.

१) प्राथमिक स्त्रोत

आकडेवारी गोळा करण्यासाठी पुढील साहित्याचा वापर करण्यात येणार आहे.

I. अनाथ मुलींकरिता मुलाखत अनुसूची
II. अनाथ आश्रमातील मुली, संस्थाचालक, वकील, दत्तक पालक, गृहपाल व इतर महत्त्वपूर्ण कर्मचाऱ्यांसाठी अनुसूची व प्रश्नावली .

२) दुय्यम स्त्रोत

दुय्यम स्वरूपाची माहिती गोळा करण्यासाठी अनाथ आश्रम कायदे, शासकीय योजना, नोंदवह्या, दैनंदिनी, पुस्तके, शोधप्रबंध, विविध लेख, दैनंदिन वर्तमानपत्र, साप्ताहिके, नियतकालिके इत्यादींच्या मार्फत माहिती मिळवली जाणार आहे.

तथ्य विश्लेषण :-

प्रस्तुत संशोधनामध्ये तथ्य विश्लेषण करण्यासाठी SPPS या सॉफ्टवेअरचा वापर करण्यात येईल तसेच व्यष्टी अध्ययन पद्धतीचा वापर करून विश्लेषण करण्यात येईल.

संशोधन मर्यादा :-

मराठवाड्यातील अनाथ आश्रमातील मुलींच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे समाजशास्त्रीय अध्ययन हा अभ्यास फक्त मराठवाडा विभागातील मुलींच्या अनाथाश्रमा पुरता मर्यादित अभ्यासावर आधारित असणार आहे. संशोधनकर्तीने मराठवाड्यातील आठ जिल्ह्यातील मुलींच्या अनाथ आश्रमांची निवड केलेली असल्याकारणाने प्रत्यक्ष भेटीसाठी प्रवास खर्चिक बाब असणार आहे ही मर्यादा डोळ्यासमोर ठेऊन संशोधन कार्य केले जाणार आहे. अनाथ आश्रमातील 0 ते ६ व ६ ते २३ वयोगटातील मुलींचा अभ्यास केला जाणार आहे, यामध्ये योग्य प्रतिसाद अभाव ही मर्यादा दिसून येत आहे.

प्रकरण नियोजन :-

प्रस्तुत संशोधनाचे प्रमुख पैलू विचारात घेता संशोधन एकूण पाच प्रकरणांमध्ये विभागण्यात येणार आहे संशोधन आराखड्याच्या आकलनासाठी त्यातील आशयाचे प्रकरण निहाय थोडक्यात विवेचन खालील प्रमाणे मांडण्यात येत आहे.

प्रकरण पहिले – प्रस्तावना

प्रकरण दुसरे- संदर्भ साहित्याचा आढावा

प्रकरण तिसरे -शास्त्रीय संशोधन पद्धती

प्रकरण चौथे- मराठवाड्यातील अनाथ आश्रमातील मुलींच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा समाजशास्त्रीय अभ्यास

प्रकरण पाचवे -तथ्य विश्लेषण, अर्थ निर्वचन, सारांश, गृहीतकृत्याची पडताळणी, निष्कर्ष व सूचना.

संदर्भ ग्रंथसूची :-

१) डॉ. प्रदीप आगलावे संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे (२०२२), विद्या प्रकाशन, रुईकर मार्ग नागपूर पृष्ठ क्र. १७,१५५,१५८,१७०,१७१,१७९,१८१
२) भागवत शोभा, आपली मुलं (२००१), राजहंस प्रकाशन पुणे, पृष्ठ क्र.५,६,७
३) श्री.संगवे विलास, समाजशास्त्र, पृष्ठ क्र. ९५
४) महिला व बालविकास आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, पुणे,पृष्ठ.क्र.१
५) श्री.ओक प्रभाकर गंगाधर,कथा आश्रमाच्या (२००५), उमा प्रकाशन पुणे,पृष्ठ क्र. २,४
६) श्री.गोखले शरदचंद्र दामोदर, नावडती मुले, (१९५४), नीलकंठ प्रकाशन पुणे, पृष्ठ क्र. ५,६,७
७) खोरे अरुणा, पोरके दिवस,(१९९४), श्रीविद्या प्रकाशन, पुणे पृष्ठ क्र. ७,८,९.
८) जोशी अचला, आश्रम नावचं घर- कहाणी श्रद्धानंद महिलांची (२०१०), मौज प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. ५,६,७.
९) माने माणिक ,भारतातील समकालीन समस्या,(१९९७), विद्या प्रकाशन, नागपूर.पृष्ठ क्र. १२,१३,१४.
१०) पेंडसे खू. चि. अनाथ मुलांवर मायेची पाखर,(१९७३), महाराष्ट्र शासनाची योजना, पृष्ठ क्र.२,३.

वेबसाईटस:-

१) https://socialwelfare.vikaspedia.in/viewcontent/social-welfare

२) https://blog.ipleaders.in/orphanage-laws-in-india-protection-of-orphan-children/

३) https://www.esakal.com/saptarang/article-writes-about-maher-organization-lusi-kurian

४) https://mr.quora.com

५) https://antyodoy.org/

६) https://www.loksatta.com/thane/article-on-orphaned-child-1148871/

७) https://en.wikipedia.org/wiki/COVID-19_pandemic_in_India

८) https://www.google.com

९) https://www.ilmuk.org/news/the-state-of-india-s-orphaned-children-crisis/

१०) https://www.loksatta.com/chaturang/lekh/article-on-orphan-children-_1682113/

११) https://en.wikipedia.org/wiki/Orphan

१२) https://karmayog.org/karo/understand/adoption-orphanages/

१३) https://www.loksatta.com/thane/article-on-orphaned-child-1148871/

१४) https://www.loksatta.com/thane/article-on-orphaned-child-1148871/

१५) https://csr.wcdcommpune.com/mr/schemes/raajayagarhasanrakasanagarha-saasakaiya-mahailaa-vasataigarha-savayansaevai-adhaaragarha

संशोधक
हाळदे शारदा संभाजीराव

मार्गदर्शक
डॉ. राऊतखेडकर एम.एस.
सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभागप्रमुख
शरदचंद्र कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
नायगाव (बा.), ता.नायगाव (खै.) जि.नांदेड.